नि.दि.दावा क्र. ३९/२०१६
शिवाजी व इतर वि. हणमंत व इतर
निशाणी क्र. ४६

**<u>निशाणी क्र. ४६ खालील आदेशः–</u>**
**<u>CNR No.MHLA140000952016</u>**

प्रस्तुत अर्ज वादीने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे जावळी, ता.औसा, जि. लातूर येथील वादीच्या मालकीची जमिन सर्वे क्र. २५ मध्ये ६० आर. जमीन या वाद मिळकतीचे निरीक्षण/मोजणी करुन नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक होण्यासाठी केला आहे.

२. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, वादी व प्रतिवादी हे आपसात शेतशेजारी आहेत. सदर दावा हा प्रतिवादीकडून वादीच्या क्षेत्रात अतिक्रमीत केलेले क्षेत्र प्रतिवादींकडून ताबा मिळणेसाठी केलेला आहे. वादी हा सर्वे क्र. २५ मधील क्षेत्रापैकी ८० आर. जमीनीचा मालक व कब्जेदार आहे. ज्याची चतुःसिमा पुर्वेस रविकिरण आळणे यांची जमीन, पश्चिमेस मुळ मालक भास्करराव कुलकर्णी यांची जमीन, दक्षिणेस वादीची गट क्र. २४ मधील जमीन व उत्तरेस हणमंत झिरमिरे यांची जमीन अशी आहे. वादीचे म्हणणे नुसार, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी व प्रतिवादींमध्ये असलेला पुर्व–पश्चिम बांध फोडून जवळपास १ एकर जमीनीवर अतिक्रमण केले आहे. वादीने सदर जमीनीची खाजगी मोजणी केली असता त्याला सदरचे अतिक्रमण झाले असल्याचे आढळून आले.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, सध्या त्या जागी नवीन बांध अस्तित्वात आहे व प्रतिवादी तो बांधही नष्ट करुन वादीस जमीनीतून बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. वादीने प्रतिवादींना सदर अतिक्रमणाचा ताबा मागितला असता त्यास प्रतिवादींनी नकार दिला. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. तसेच उपअधिक्षक भुमी अभिलेख औसा यांच्याद्वारे शासकीय मोजणी झाल्यास सदरचा वाद कायमचा संपुष्टात येवू शकतो. सबब वादीने अर्ज मंजुर

करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादींना पुरेशी संधी देवूनही प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

५. अतिक्रमण दुर करण्याच्या दाव्यात उभयतांना मान्य नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने त्यांच्या मिळकतीची मोजणी होऊन नकाशा व अहवाल मिळविण्याची मागणी केली आहे. वादीचा आणि प्रतिवादींचा वाद मिळकतीबाबत वाद आहे असे दिसते. म्हणुन तज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करुन मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद संपणार नाही असे दिसते.

६. म्हणून उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यासाठी वादीने आयुक्ताचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज **निशाणी क्र. ४६** मंजूर करण्यात येतो.

२. **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ९ सह वाचणीय कलम ७५ (ब)** नुसार उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे जावळी, ता.औसा, जि. लातूर येथील जमीन सर्वे क्र. २५ मधील वादीच्या मालकीची ६० आर. जमीनीची मोजणी करुन, अतिक्रमण असल्यास ते दर्शवुन, हद्दी, निशाणी, खुंट रोवून आयुक्तास पत्र मिळाल्यापासुन २ महिन्याच्या आत नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणुक करण्यात येते.

३. वादीने उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांच्या कार्यालयात

त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादीने ती ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसुल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

५. आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी प्रक्रिया नियमावलीतील प्रकरण क्र.८ परिच्छेद १५१ ते १७० व महसुल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्ताचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवुन दिलेल्या मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागु शकतात.

६. उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

७. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते. वादीला वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे आकलन होण्यासाठी देण्याचे निर्देशत करण्यात येते.

८. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही

पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पुर्ण करावे.

९. वादीने आदेश कलम ३, ४ आणि ७ ची पुर्तता तात्काळ करावी.

१०. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

Digitally signed by PRASAD DIPAK KOLEKAR
Date: 2023.03.15 11:16:53 +0530

औसा. **(पी.डी. कोळेकर)**

दिनांकः– १४/०३/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, औसा.

जिल्हा लातूर